॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Phone : (02462) 229242, 43 | **ACADEMIC (APPROVAL) SECTION** | Website : srtmun.ac.in

Fax : (02462) 215572 | E-mail : approvalsrtmun@gmail.com

## परिपत्रक

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : विद्यापीठ अनुदान आयोगाने M.Phil. आधारे NET मधून सूट दिलेल्या अध्यापकांचे सेवांतर्गत प्रगती योजनेनुसार (CAS) स्थाननिश्चिती लाभ जिल्हानिहाय कॅस केंद्राव्दारे कार्यवाहीबाबत.

संदर्भ : १) दि. ०७ ऑगस्ट, २०२५ रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीतील निर्णय (ऐनवेळचा विषय)
२) शा. निर्णय क्र.संकीर्ण–२२०४/प्र.क्र.९१/विशि–१,दि. १६/०२/२०२३
३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण–२२०४/प्र.क्र.९१/विशि–१, दि. १८/७/२०२५.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. शैक्ष/मा./कॅस/०२/२०२५–२६/२२१, दि. ११/०७/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय दि. ०७ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषद बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठ अंतर्गत कार्यरत अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एकूण–३८७ अध्यापकांना M.Phil. आधारे NET मधून सूट दिलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने संदर्भीय पत्र क्र. ०३ नुसार NET मधून M.Phil. अर्हतेवर सूट मिळालेल्या अध्यापकांना सेवांतर्गत प्रगती योजनेनुसार (CAS) **AL-11, 12, 13A व 14** प्रमाणे स्थाननिश्चिती लाभ जिल्हानिहाय केंद्रामार्फत देण्याबाबतचा मा. व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय झाला आहे.

जिल्हानिहाय (CAS) केंद्र यापूर्वीच खालीलप्रमाणे निश्चित केलेली असून सदर केंद्रावर संबंधित सर्व अध्यापकांनी आपले स्थाननिश्चिती प्रस्ताव दि. २०/०८/२०२५ पर्यंत सादर करावेत, तसेच इच्छुक महाविद्यालयातील प्राध्यापक (AL-14) व सहयोगी प्राध्यापक (AL-13A) यांनी स्थाननिश्चितीसाठीचे प्रस्ताव दाखल करावेत. M.Phil. अर्हतेवर NET मधून सूट मिळाल्यामुळे काही अध्यापकांच्या पूर्वी झालेल्या स्थाननिश्चिती तारखेत बदल होत असल्यास अशा संबंधीत अध्यापकांनीही त्यांचे प्रस्ताव तसेच स्थाननिश्चिती तारखेतील बदल एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असल्यास अशा अध्यापकांना त्यांचे API/Score तपासणी करणेसाठी प्रस्ताव दाखल करावेत.

| अ.क्र. | जिल्हा | केंद्राचे नांव |
|---|---|---|
| ०१ | नांदेड | पीपल्स महाविद्यालय, नांदेड |
| ०२ | परभणी व हिंगोली | बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी |
| ०३ | लातूर | दयानंद कॉमर्स कॉलेज, लातूर |

सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील पात्र व इच्छुक शिक्षकांचे स्थाननिश्चिती/पदोन्नतीचे प्रस्ताव वर नमूद जिल्हानिहाय केंद्रावर सादर करावेत. संदर्भ क्र. ०४ अन्वये यापुर्वी परिपत्रकान्वये कळविल्यानुसार AL-11 वAL-12 स्थाननिश्चिती करिता चार प्रतीत सादर करावेत. तसेच प्राध्यापक (AL-14) व सहयोगी प्राध्यापक (AL-13A) स्थाननिश्चिती करिता इच्छुक अध्यापक/महाविद्यालयांनी रू. १,०००/— (रू. एक हजार केवळ) हाताळणी खर्चासह जिल्हाकेंद्रावर चार प्रतीत प्रस्ताव सादर करावेत, यासाठी समिती सदस्यांचे प्रवास व दैनंदिन भत्ता विद्यापीठ नियमानुसार जिल्हाकेंद्राने न अदा करता तो संबंधीत अध्यापकांच्या महाविद्यालयाने अदा करावा.

सदर प्रस्तावावर समितीने सकारात्मक शिफारस केल्यानंतर चार प्रस्तावापैकी एक प्रस्ताव विद्यापीठाकडे, एक जिल्हा केंद्रावर व दोन प्रस्ताव संबंधीत महाविद्यालयास परत करावेत.

तसेच प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, जिल्हा केंद्रावरती प्रस्ताव सादर करत असतांना या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र **(Format)** मध्ये संबंधीत शिक्षकांनी संपूर्ण माहिती भरून त्याची एक प्रत **Hard Copy** मध्ये व एक **Soft Copy** केंद्रावरती प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

'ज्ञानतिर्थ परिसर' विष्णुपूरी, नांदेड.
जा.क्र.शैक्ष./मान्यता/कॅस/०२/२०२५—२६/366
दिनांक : १४/०८/२०२५

(सही) 14/8
सहा. कुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

१. मा. प्राचार्य, पीपल्स महाविद्यालय, नांदेड. (जिल्हा केंद्र नांदेड)
२. मा. प्राचार्य, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी. (जिल्हा केंद्र परभणी व हिंगोली)
३. मा. प्राचार्य, दयानंद कॉमर्स कॉलेज, लातूर.(जिल्हा केंद्र लातूर)
४. मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड.
५. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.